# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/अंतिम मान्यता/२०१२/८८४
दिनांक : 21 AUG 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये नवीन पदविका अभ्यासक्रम, प्रवेशक्षमता वाढ, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये पदविका अभ्यासक्रमाची सेकंडशिफ्ट इ. यांना या संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्याबाबत....

उपरोक्त विषयाबाबत असे निदर्शनास आलेले आहे की, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये पदविका अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम, प्रवेशक्षमतावाढ, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये पदविका अभ्यासक्रमाची सेकंडशिफ्ट सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, दिल्ली तसेच शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. अशा काही संस्थानी सदर अभ्यासक्रमांस अद्यापपर्यंत या संचालनालयाची अंतिम मान्यता घेतलेली नाही.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये ज्या पदविका अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांना नवीन पदविका अभ्यासक्रम, प्रवेशमता वाढ, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये पदविका अभ्यासक्रमाची सेकंडशिफ्ट सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, दिल्ली तसेच शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे, तथापी, सदर अभ्यासक्रमास या संचालनालयाची अंतिम मान्यता घेतलेली नाही अशा अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये विद्यार्थी प्रवेशित केलेले असल्यास सदर प्रवेश अनधिकृत प्रवेश समजण्यात येतील. तसेच सदर अनधिकृत प्रवेशाबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल सदर कार्यवाहीस संबंधीत संस्था जबाबदार राहील. याबाबतच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थाना आपल्या स्तरावर तात्काळ देण्यात याव्यात.

तसेच पुढे असेही नमूद करण्यात येते की, अशा संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील सदर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीना विभागीय कार्यालयमार्फत मान्यता देण्यात येवू नये. सदर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीस मान्यता देण्यात आल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत विभागीय कार्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ पुणे.
२. प्राचार्य, सर्व अनुदानित/ विनाअनुदानित संस्था (संबंधीत विभागीय कार्यालयांमार्फत)
३. निवडनस्ती.

---

**अतितातडीचे**

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
क्र.विकाअ/शिक्षण/मान्यता/२०१२/२२८९
दिनांक :- २९/०८/२०१२

प्रति,

प्राचार्य,
सर्व संबंधीत शासकीय / अनुदानित पदवी/ पदविका संस्था

त्यांना कळविण्यात येते की उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रतिलिपी : प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.